CNR Number MHNG09-002912-2015

नियमीत दिवाणी दावा क्र.५६/२०१६ निशाणी क्र.१५

उलट तपास प्रतिवादीचे वकील श्री. एच. आय. ताजने तर्फे :-

१०. हे खरे नाही की, माझ्या आजोबाचे नाव महादेव आनंदराव इंगोले असे आहे. हे खरे नाही की, महादेव आणि भिवा हे दोघे सख्खे भाउ होते. हे खरे की, महादेव यांच्या मृत्युनंतर त्यांना रंगुबाई उर्फ गंगु, दोन मुले आणि तिन मुली असे वारस होते. हे मला माहिती नाही की, भिवाजी यांना चार मुले व पत्नी असे वारस होते किंवा कसे. हे खरे की, माझ्या लहान भावाचा जन्म सन १९७३ सालचा आहे व त्याच्या जन्माच्या अगोदरच आजोबा महादेवराव मरण पावले. हे मला आठवत नाही की, दिनांक २६.०६.१९७० रोजी माझे वडील व ईतर तसेच माझ्या वडीलांचे चुलत भाऊ व त्याचे वारस यांच्यामध्ये हिस्से वाटणी झाली किंवा कसे. दिनांक ३०.०४.१९७८ रोजी माझे वडील त्यांचे भाउ नामदेव आजी रंगुबाई यांच्यामध्ये वाटण्या झाल्या असेल. हे खरे की, सन १९७० आणि १९७८ हिस्से वाटणी मौजा पाटणसावंगी येथील शेत जमीनीचे आहे. हे खरे की, माझी आजी रंगुबाई हिला शेवंताबाई नावाची बहीण होती. हे खरे की, रंगुबाई व शोवंताबाई यांना त्याच्या आईकडून मौजा कोसुंबी येथे जमीन मिळाली होती. सदर जमीनीचे वर्णन दावा मिळकतीमध्ये नमुद आहे.

११. हे खरे की, रंगुबाईच्या मृत्युनंतर मौजा कोसुंबी आणि पाटणसावंगी येथील सर्वे क्र.५ हे जमीन तिच्या वारसांच्या नावाने फेरफार करण्यात आली. हे मला माहीत नाही की, त्यानंतर माझ्या वडीलांचे काका आणि तीन बहीणीने हक्क सोडण्याचा लेख लिहून दिला होता. मी सर्वे क्र.५ घराचा वार्ड क्र.१ मधील घराच्या संदर्भातील एक दस्तऐवज दाखल केला होता. मला सदर घराची मालमत्ता क्रमांक सांगता येत नाही. हे खरे की, पाटणसावंगी गावामध्ये मालमत्ता क्र.३९८ ही माझ्या वडीलांच्या आणि काकाच्या नावाने आहे. हे मला माहीत नाही की, त्याचा नगर भुमापण क्र.३४३ आणि ३४६ आहे किंवा कसे. हे मला माहीत नाही की, सदर हक्कसोड लेखामध्ये या दोन्ही जागेचा उल्लेख नमुद केला आहे किंवा कसे. हे खरे की, माझे वडील सरकारी नोकरीला होते आणि ते सन १९९९ साली सेवानिवृत्त झाले. हे खरे की, त्यांनी नोकरीच्या पैशातुन सर्वे क्र.५, वार्ड क्र.१ मधील घर बांधले होते. हे मला माहीत नाही की, दिनांक ०१.०२.२००४ साली सदर घरावर टॅक्स लावण्यासाठी त्यांनी

ग्रामपंचायत पाटणसावंगी येथे अर्ज दिला होता किंवा कसे. हे खरे की, सदरची मालमत्ता मी दाव्यामध्ये समाविष्ट केली आहे आणि तिचा मालमत्ता क्र.१ आहे.

प्रश्न : मी प्रस्तुत दाव्यामध्ये वार्ड क्र.२ मध्ये असलेली मालमत्ता नमुद न केल्यामुळे तुमचा दावा मंजुर होण्यासाठी पात्र नाही ?

उत्तर : मला सदर जागेचा संपुर्ण दस्तऐवज मिळाला नाही आणि त्याची माहिती नसल्यामुळे मी तो समाविष्ट केला नाही. तसेच त्या मालमत्तेमध्ये काकांचा आणि ईतर काकांचा वारसाचे नाव आहेत.

१२. पाटणसावंगी येथील शेत जमीनीवर विहीर आहे. हे खरे की, पटवारी कार्यालयामार्फत माझ्या वडीलांनी मृत्युपत्र करुन दिल्यासंदर्भात सुचना मला मिळाली होती व त्यामळे मी तलाठ्याकडे आणि पटवा–याकडे त्या संदर्भात हरकत नोंदविली होती. हे खरे की, त्यानंतर माझे बहीण भाऊ आणि आई यांच्या नावे फेरफार झाला व सदर फेरफारसंबंधी मी उप–विभागीय अधिकारी यांच्याकडे अपिल दाखल केली आहे. हे खरे की, मी सदरचे मृत्युपत्र रद्दबादलसाठी कुठल्याही न्यायालयात केस दाखल केली नाही. हे खरे नाही की, सदरचे मृत्युपत्र माझ्या वडीलांनी जास्त आराजीचे करुन दिल्यामुळे मला मान्य नाही. माझ्या वडीलांना अर्धांगवायु होता या संदर्भात दस्तऐवज मी अभिलेखावर दाखल केला नाही. त्याच्या प्रकृती संदर्भातील कुठलाही दस्त मी अभिलेखावर दाखल केला नाही. हे खरे की, मी माझी पत्नी व मुलाबाळासहीत औरंगाबाद येथे राहतो व तेथेच माझी नोकरी आहे. हे खरे की, माझे गाव आणि औरंगाबाद येथील अंतर जवळपास ६०० किलो मिटर आहे. त्यामुळे मला गावी येणे जाणे परवडत नाही. हे खरे नाही की, दावा मिळकत ही माझ्या वडीलांची स्वमिळकत मालमत्ता होती व त्यामुळे त्यांना सदर मिळकतीसंदर्भात मृत्युपत्र करण्यासंदर्भांत संपुर्ण अधिकार होता. हे खरे की, मौजा कोसुंबी येथील जमीन मी ठेक्याने दिली आहे. हे खरे की, मी रविंद्र हटकर आणि अशोक खुजनारे यांना ओळखतो. मी माझ्या भावाने किंवा आईने वडीलांनी खोटे मृत्युपत्र करुन दिल्यासंदर्भात पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली नव्हती. हे खरे नाही की, मी माझ्या वडीलांना हिस्सा मागितला होता व त्यांनी वाटणी न करुन दिल्यामुळे मी त्यांना मारहाण केली होती. हे खरे नाही की, दिनांक ३१.०१.२०१७ रोजी मी माझ्या आईला पाटणसावंगी येथील शेतात असलेल्या घरातुन काढुन देऊन शिवीगाळ केली

होती. त्यामुळे तिने त्या संदर्भात पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. हे खरे नाही की, माझ्या नावे घर आहे. हे खरे नाही की, औरंगाबाद येथे घर घेण्यासाठी माझ्या वडीलांनी मला पैसे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुरावा प्रतिज्ञालेख परिच्छेद क्र.५ मधील नमुद केलेला मजकूर मी खोटा लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, परिच्छेद क्र.६ मधील मजकूर मी खोटा नमुद केला आहे. हे खरे नाही की, मी माझ्या आई वडीलांना त्रास दिल्यामुळे त्यांनी स्वखुशीने दोन साक्षीदारांसमक्ष मृत्युपत्राचा लेख तयार केला आहे. हे खरे नाही की, तो मृत्युपत्राचा लेख खरा असल्यामुळे मी कुठल्याही न्यायालयात केस केली नाही. हे खरे की, सदर मृत्युपत्राच्या आधारे तलाठी अभिलेखावर व ग्रामपंचायतच्या अभिलेखावर नोंदी करण्यात आल्या आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या आजोबाच्या वडीलाचे नाव भिवा होते हे मी खोटे सांगत आहे.

प्रश्न : तुमच्या शपथपत्रामध्ये तुमचे आजोबा सन १९८० साली तर आजी रंगुबाई २००८ साली मरण पावली असे तुम्ही खोटे सांगितले आहे ?

उत्तर : मला तारीख माहिती नव्हती म्हणून तसे नमुद केले आहे.

प्रश्न : माझ्या शपथपत्रामध्ये माझ्या आजोबांना दोनच मुले होते असे तुम्ही खोटे नमुद केले आहे ?

उत्तर : तिन आत्या सुध्दा आहेत परंतु त्यांचा संबंध नसल्यामुळे मी ते नमुद केले नाही.

१३. हे म्हणणे खरे नाही की, परिच्छेद क्र. २ मधील मजकूर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मृत्युपत्रामध्ये नमुद केलेली मालमत्ता सोडून ईतर मालमत्तेमध्ये माझा समान हिस्सा आहे. हे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला व आज खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेर तपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

माझे समक्ष

(ज. शं. कोकाटे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सावनेर.

दिनांकः०७.०८.२०१८

जिल्हा–नागपुर

**C E R T I F I C A T E**

**"I affirm that the contents of this P. D. F. File of Evidence are word to word as per original Evidence."**

**Name of Stenographer : N. B. Payade**